महाराष्ट्र शासन

# उद्योग संचालनालय

# जिल्हा उद्योग केंद्र, सिंधुदुर्ग

मुख्य प्रशासकीय इमारत, ए ब्लॉक, दुसरा मजला, सिंधुदुर्गनगरी, ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग-416812.
E-mail:-didic.sindhudurg@maharashtra.gov.inदूरध्वनी (02362) 228705 / 228662.

---

## जिल्हा निर्यात प्रचलन समिती बैठक दि. २९/०४/२०२४ — इतिवृत्त

जिल्हा निर्यात प्रचलन समितीची बैठक दि.२९/०४/२०२४ दुपारी १२.३० वा. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग यांचे दालनात संपन्न झाली.

महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, सिंधुदुर्ग तथा निमंत्रक, जिल्हा निर्यात प्रचलन समिती यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन मा.अध्यक्षांचे अनुमतीने सभेचे कामकाजास सुरुवात करण्यात आली.

महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, सिंधुदुर्ग तथा निमंत्रक यांनी शासनाने नव्याने गठित केलेली राज्य निर्यात प्रचलन परिषद व त्याअंतर्गत गठित केलेली जिल्हा निर्यात प्रचलन समितीची कार्ये व उद्दिष्टे याबाबत सर्वांना माहिती दिली. तसेच सिंधुदुर्ग जिल्हयातून सध्या निर्यात होणा-या विविध प्रकारच्या मालाबाबतची संबंधित अभिकरण संस्थांकडून प्राप्त झालेली आकडेवारी तसेच निर्यातीचे दृष्टीने जिल्हयामध्ये उपलब्ध असलेली मूलभूत सुविधा याबाबतची माहिती सर्वांसमोर सादर केली.

सदरचे चित्र पहाता सिंधुदुर्ग जिल्हयामधून होणारी विविध मालाची निर्यात अत्यल्प असून निर्यातवाढीस भरपूर वाव असल्याचे मा.अध्यक्षांनी नमूद केले. तसेच, निर्यातक्षम वस्तूंची उपलब्धता असणारे उद्योग, व्यक्ती व संस्था यांना निर्यात करणे शक्य व्हावे यासाठी Handholding Support ची आवश्यकताही मा.अध्यक्षांनी व्यक्त केली. सदरचे चित्र बदलणेसाठी या समितीच्या सदस्यसंस्थां कशाप्रकारे स्वतः भूमिका निभावू शकतात याबाबतचा तपशील यंत्रणांनी मांडावा व समितीतील सहभागी औद्योगिक संस्थांनी त्यांना निर्यात वाढविणेचे दृष्टीने



Scanned with OKEN Scanner

कोणत्या गोष्टी होणे आवश्यक वाटते याबाबत निवेदन करावे जेणेकरुन यापुढील कालावधीत करावयाच्या नेमक्या उपाययोजनांबाबत निर्णय घेण्यात येईल असेही मा.अध्यक्षांनी सूचित केले.

दि. १४/०३/२०२४ रोजी संपन्न बैठकीतील सर्व मुद्यांवर चर्चा होऊन कार्यवाही करण्यात आली आहे.

(एस.एस.एस.दामले)
महाव्यवस्थापक,
जिल्हा उद्योग केंद्र तथा
निमंत्रक, जिल्हा निर्यात प्रचलन समिती, सिंधुदुर्ग.

(श्री. मकरंद प्र. देशमुख)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग तथा
प्रतिनिधी, अध्यक्ष, जिल्हा निर्यात प्रचलन समिती, सिंधुदुर्ग.

अवलोकन केले.

(श्री. किशोर तावडे)
जिल्हाधिकारी,, सिंधुदुर्ग तथा
अध्यक्ष, जिल्हा निर्यात प्रचलन समिती, सिंधुदुर्ग.

Scanned with OKEN Scanner